## CHALLAN
### MTR Form Number-6

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **GRN** | MH000279024202122E | **BARCODE** | | **Date** | 07/04/2021-18:28:06 | **Form ID** |

| | |
|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration |
| **Type of Payment** | Non-Judicial Stamps<br>Non-Judicial Stamps |
| **Office Name** | THN9_THANE NO 9 JOINT SUB REGISTRAR |
| **Location** | THANE |
| **Year** | 2021-2022 One Time |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** |
|---|---|
| 0030045501 Amount of Tax | 60000.00 |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| **Total** | 60,000.00 |

| **Payer Details** | |
|---|---|
| **TAX ID / TAN (If Any)** | |
| **PAN No.(If Applicable)** | ADLPT9871E |
| **Full Name** | KOKILA TOURS AND TRAVELES |
| **Flat/Block No.** | 12 SURVEY NO 312/18 SINGAPUR GARDEN |
| **Premises/Building** | |
| **Road/Street** | TAKALI ROAD |
| **Area/Locality** | Thane |
| **Town/City/District** | |
| PIN | 4 2 2 0 1 1 |

**Remarks (If Any)**

SUPPY OF MINI TEMPO JET SPRAY MACHINE DIESEL DRIVER AND ETC IN MBMC AREA

| | |
|---|---|
| **Amount In Words** | Sixty Thousand Rupees Only |

| | |
|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA |
| **Cheque-DD Details** | |
| Cheque/DD No. | |
| Name of Bank | |
| Name of Branch | |

| **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|
| Bank CIN | Ref. No. | 00040572021040771925 | CKQ1676919 |
| Bank Date | RBI Date | 07/04/2021-18:24:29 | Not Verified with RBI |
| Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :

Mobile No. : 9699671675

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

# // करारनामा //

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागासाठी औषध फवारणी करणेकरीता भाडेतत्वावर (५ वर्षाच्या कालावधीकरीता) १० मिनी टेम्पो ( जेट स्प्रे मशीन, वाहन चालक, इंधन व इतर साहित्यासह) पुरवठा करणेकरीता करारनामा**

हा करारनामा मुक्काम भाईंदर, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दि.03·05·21 रोजी करण्यात आला.

**मे. कोकिळा टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स**
**प्लॉट क्र. १२ सर्वे क्र. ३९२/१८**
**सिंगापूर गार्डन, टाकळी रोड**
**नाशिक.**

**प्रथम पक्षिय**

**आणि**

**व्दितीय पक्षिय**

**मा.उप-आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**यांच्यामध्ये होत आहे.**

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका ही नागरी संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी स्थापन झाली आहे आणि त्यांचे मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ४०११०१ येथे आहे.

आणि ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात डासांचा प्रादुर्भाव होऊ नये व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा पुरविणेकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रात वेळोवेळी औषध फवारणी करणे अत्यावश्यक आहे. त्याकरीता आवश्यक मिनी टेम्पो भाडेतत्वावर पुरवठा करुन घेणेकरीता मा. स्थायी समिती सभा दि.१६/०३/२०२० ठराव क्र.११५ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

आणि ज्याअर्थी महानगरपालिका क्षेत्रात औषध फवारणी करीता भाडेतत्वावर मिनी टेम्पो पुरवठा करणेकरीता ठेकेदार नेमने करीता विविध वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन इ-टेंडर पध्दतीने दि.०२/०७/२०२० पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी ठेकेदार यांनी महानगरपालिका क्षेत्रात औषध फवारणी करीता भाडेतत्वावर मिनी टेम्पो पुरवठा नूसार निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केल्या नुसार महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी ठेकेदार यांनी निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या औषध फवारणी करीता भाडेतत्वावर मिनी टेम्पो पुरवठाकरणेस ठेकेदार यांचा प्रस्ताव स्विकारला आहे व मा. स्थायी समिती सभा दि.१२/०२/२०२१ ठराव क्र.४८ अन्वये आपण सादर केलेले दर मंजुर केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी प्रस्ताव दस्तऐवजांमध्ये केलेल्या अटी, शर्ती, निर्देश आणि सुचनांचे योग्यरितीने पालन करण्याची सर्व जबाबदारी ठेकेदार यांची आहे.

त्याअर्थी सदरचा करारनामा साक्षीदारांच्या समक्ष करण्यात येत असून उभय पक्षांना मान्य व कबूल आहे, तो खालीलप्रमाणे आहे.

कोकीळा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
प्रोप्रायटर

अटी व शर्ती :

१. निविदा कालावधी ५ वर्षासाठी राहील आवश्यकता असल्यास प्रथम पक्षिय यांचे काम समाधानकारक असल्यास निविदा कालावधी वाढविला जाईल व वाढीव कालावधीत मंजुरदाराने (जेट स्प्रे मशीन, ५०० लि. क्षमतेची टाकी, वाहन चालक, इंधन व इतर साहित्यासह) पुरवठा प्रथम पक्षिय यांना करावा लागेल.

२. फवारणी यंत्र, ५०० लि. क्षमतेची टाकी, वाहनास व जेट स्प्रे मशीनला लागणारे इंधन, वाहन चालक यांचे भत्ते दुरुस्ती खर्च इ.संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३. वाहन चालक आर. टी. ओ. मान्यताप्राप्त परवानाधारक असावा व त्याचा परवाना रद्द झालेला नसावा तसेच वाहनाचा परवाना (पासिंग) वेळोवेळी करुन घेणे, नुतनीकरण करणे प्रथम पक्षिय यांचेवर बंधनकारक राहील.

४. ठेकेदाराने स्वखर्चाने मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार योग्य रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरणा करुन करारनामा निविदा मंजुरीचे पत्राच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत करुन घ्यावा लागेल.

५. व्दितीय पक्षिय कडून सदर कामासंदर्भात स्विकृती पत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांत प्रथम पक्षिय हे व्दितीय पक्षिय यांचेकडे रक्कमेच्या ५% च्या मर्यादेत प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जमा करतील. सदर सिक्युरीटी डिपॉझिटसाठी लागणारी रक्कम बँक गॅरेंटी स्वरुपात भरणा करण्यात यावा. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेच्या बँक गॅरेंटी स्वरुपात महानगरपालिका यांचे नावाने देतील. सदर प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) ही सदर कराराच्या अटींची पुर्तता होणेपर्यंत मुदतीकरीता वैध असेल. प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर कराराच्या अटीची पूर्णपणे पूर्तता झाल्यानंतर तसेच व्दितीय पक्षिययांची कोणतीही देय रक्कम शिल्लक नसल्यास किंवा त्यावर कोणताही दावा नसल्यास मागणी केल्यानंतरच सदर डिपॉझिटचा परतावा करण्यात येईल.

६. स्वतः चे मालकीचे/ भाडयाने घेतलेल्या फवारणी यंत्र व वाहनावर "वैद्यकीय आरोग्य विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका" असे लिहणे बंधनकारक आहे. तसेच वाहनाचा मागील बाजुस फॅब्रीकेशन करुन शटर लावणे बंधनकारक राहील.

७. फवारणीसाठी लागणारे किटकनाशक/अळीनाशक, औषध फवारणी कर्मचारी महानगरपालिकेकडुन पुरविण्यात येतील.

८. महानगरपालिकेकडुन पुरविलेल्या औषध फवारणी कर्मचारी यांच्याशी समन्वय ठेवून कामे पूर्ण करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

९. मालकीचे/ भाडयाने घेतलेले औषध फवारणी टेम्पो व मशीन सकाळी ७ ते३ वाजेपर्यंत या वेळेत फवारणीसाठी वापरण्यात येईल तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेस गरज भासल्यास आवश्यकतेनुसार वेळेत बदल केला जाईल.

१०. वैद्यकीय आरोग्य अधिकारी ज्या ठिकाणी/प्रभागात औषध फवारणीचे काम देतील, ते काम ठेकेदारास बंधनकारक राहील.

११. वाहन चालक यांनी वाहन वापरल्याच्या नोंदी नोंदबुकात ठेवण्यात याव्यात व त्यावर दररोज वाहन वापरल्याची सही घेण्यात यावी. बिल सादर करताना मासिक डयूटी तक्त्यावर अधिकाऱ्याची सही घेण्यात यावी. तसेच आठ तासाच्या डयुटीमध्ये जेवणाचा कालावधी धरण्यात आला आहे.

१२. मोटार वाहन कायदयानुसार वाहनासंबंधी सर्व पुर्तता करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. पुरवठा करित असलेल्या टेम्पोचा विमा काढण्याची जबाबदारी प्रथम पक्षिय यांची राहील. तसेच सदर विम्याची एक प्रत दरवर्षी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सादर करणे प्रथम पक्षिय यांच्यावर बंधनकारक राहील.

कोकीळा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स

प्रोप्रायटर

१३. वाहनचालक/ वाहनाच्या इन्शुरन्स, आर.टी.ओ./ पोलिस अथवा सरकारी यंत्रणेकडुन कोणतेही दंडात्मक कार्यवाही झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील व त्यासाठी येणारा खर्च ठेकेदार यांना करावा लागेल.

१४. वाहनांची स्थिती, वाहन चालकांचे वर्तणूक याबाबत तक्रार आल्यास ठेकेदार यांना वाहन व वाहनचालक बदली करुन द्यावा लागेल. तसेच वाहन चालक हे मद्यपान करुन कामावर येणार नाहीत याची संपूर्ण जबाबदारी प्रथम पक्षिय यांचर राहील.

१५. ठेकेदाराने संबंधित कामासाठी नेमलेल्या वाहन चालक यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व भत्ते देणे बंधनकारक राहील. तसेच वाहन चालकाच्या वेतनाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यासे त्याचे निराकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

१६. फवारणी कामाची आवश्यकता नसल्यास भाडयाने घेतलेले फवारणी यंत्र वाहन बंद ठेवण्याचा अधिकार मिरा भाईंदर महानगरपालिकेस राहील त्या कालावधीत कोणतेही देयक ठेकेदारास दिले जाणार नाही.

१७. कार्यादेश दिलेल्या मुदतीत (टॅम्पो, जेट स्प्रे मशीन, ५०० लि. क्षमतेची टाकी व इतर आवश्यक साहित्य) ज्या दिवशी पुरवठा न केल्यास प्रती दिन /प्रती वाहन दंड रु.५००/- आकारण्यात येईल.

१८. पुरवठा केलेले वाहनांवर जी.पी.एस. स्वखर्चाने लावणे ठेकेदारास बंधनकारक राहील.जी.पी.एस. व्दारे वाहन ट्रॅकिंग सुविधा उपलब्ध करुन देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल अन्यथा मासिक देयक अदा केले जाणार नाही. तसेच रु.१०००/- दंड प्रतिदिन प्रतिवाहन राहील. जी.पी.एस. नादुरुस्त झाल्यास प्रथम पक्षिय यांनी स्वखर्चाने दुरुस्त करणे बंधनकारक आहे.

१९. देयक सादर करताना जी.पी.एस. ट्रॅकिंगचा डाटा सोबत जोडणे आवश्यक राहील.तसेच जी.पी.एस. ट्रॅकिंगचा डाटा वेब साईटवर ३ महिन्यासाठी सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रथम पक्षिय यांची राहील.

२०. निविदेत नमूद केल्याप्रमाणे मा. स्थायी समिती दि.१२/०२/२०२१ ठराव क्र.४८ अन्वये ठेकेदारास प्रती टेम्पो/ प्रती महिना रु.४५०००/- एवढा दर व वार्षिक ५ टक्के दरवाढ देण्यात येईल.

२१. ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक सादर केल्यानंतर महानगरपालिकेकडून देयक अदा करण्यात येईल.

२२. वाहन/वाहनचालक उपलब्धं न झाल्यास त्या दिवशी दुसरे वाहन वा वाहन चालक तात्काळ उपलब्ध करुन द्यावे लागेल. तसेच ज्या दिवशी वाहनाच्या/ वाहन चालकाचा पुरवठा केला नसेल त्या दिवसाचा दंड देयकातुन वसुल केला जाईल.

२३. मंजुर निविदेतील किंवा कोणतेही बाबतीत काहीही वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त सो. यांचा निर्णय अंतिम राहील व दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

२४. ठेकेदाराने सादर केलेली अनामत रक्कम निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर महानगरपालिच्या नियमानुसार परत केली जाईल.

२५. पुरवठा करण्यात येणारे मिनी टेम्पो BS VI मानांकन असणे बंधनकारक आहे.

२६. पुरवठा करण्यात येणारे मिनी टेम्पो औषध फवारणीचे काम संपल्यानंतरही दुपारी ३.०० वाजेपर्यंत(कार्यलयीन वेळ संपेपर्यंत) संबंधित आरोग्य केंद्रामध्ये उभे करणे बंधनकारक राहील.

२७. निविदेचा कालावधील ५ वर्षाचा असला तरी २ वर्षानंतर कामाचा आढावा घेऊन काम समाधानकारक असल्यासच उर्वरित कालावधीसाठी काम करणेस परवानगी देण्यात येईल.

२८. काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

२९. कामगारांसाठीचे सर्व कायदयामधील तरतूदींचे पालन करणे प्रथमपक्षावर बंधनकारक राहील.

३०. पुरविण्यात आलेल्या वाहनाचा अपघात झाल्यास त्याचे संपूर्ण दायित्व प्रथम पक्षावर राहील. तसेच कोणास नुकसान झाल्यास भरपाई देण्याची जबाबदारी प्रथम पक्षिय यांची राहील.

३१. प्रथम पक्षिय कडुन औषध फवारणी वाहन चालकांचे वेतन त्यांना रोखीने अदा न करता त्याचे राष्ट्रीय/शेडयुल्ड बँकेत खाते उघडुन मासिक वेतन सदर खात्यावर जमा करणे किंवा संबधित

कोकीळा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
प्रोप्रायटर

औषध फवारणी वाहन चालकाचे नावाने Account payee Cross Cheque व्दारे अदा करणे बंधनकारक आहे.

३२. प्रथम पक्षिय याने भाडेतत्वावर मिनी टेम्पो पुरवठा करण्याचे काम खंडित केल्यास प्रथम पक्षिय यांनी निविदेतील व करारानाम्यातील अटी-शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेल्या दंडाची रक्कम, निविदेतील एकूण कंत्राट रक्कमेच्या १०% पर्यंत झाल्यास मंजूर प्रथम पक्षिय यांची सुरक्षा अनामत (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कम जप्त करुन सदरचे काम रद्द करण्यात येईल व प्रथम पक्षिय यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३३. प्रथम पक्षिय यांच्याकडून नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर व शासनामार्फत वेळोवेळी लावण्यात येणारे कर देयकातुन कपात करण्यात येतील.

३४. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाकारांवर बंधनकारक राहील. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाकाराने संबधित कार्यालयाकडून घेणे बंधनकारक राहील.

३५. वाहन चालकास ओळखपत्र देणे बंधनकारक असुन, वाहनचालकाने ओळखपत्र स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी परिधान करणे आवश्यक आहे व कामाच्या दिवशी सदर ओळखपत्र वाहनचालकाकडे असणे बंधनकारक राहील.

३६. सदर कामासदंर्भात उभय पक्षियांच्या मध्ये वाद उद्‌भवल्यास ठाणे येथील न्यायालयास अधिकार राहतील.

३७. Safety requirements :- ठेका औषध फवारणी वाहन चालक यांना काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Loss of life) व तसेच नैसर्गिक आपत्ती (उदा. वीज, पाऊस, भूकंप इ.) मुळे इजा, अपघात मृत्यु संभवल्यास, त्यांची सर्व नुकसान भरपाईची व इतर कायदेशीर जबाबदारी सर्वस्वी प्रथम पक्षिय यांची राहील

३८. Financial & legal liability :- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्यांची जबाबदारी प्रथम पक्षिय यांची राहील.

३९. Sub-contract :- वाहन पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रक्टर/कंपनी/ठेकेदार/इतर व्यक्ती यांना परस्पर देता येणार नाही. सदरचे काम प्रथम पक्षिय यांनी स्वतः करावयाचे आहे. प्रथम पक्षीय यांनी कंत्राट कालावधी दरम्यान काम करणेस खंडीत केल्यास सदरचे काम दुसऱ्या व्यक्तीकडून करुन घेण्यात येईल व सदर कामासाठी मनपास जादा रक्कम दयावी लागल्यास फरकाची रक्कम प्रथम पक्षीय यांच्याकडुन वसुल करणेत येईल.

४०. बाल मजुर कायद्याचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक राहील. बालमजुरास कामावर ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, बाल मजुर प्रतिबंध कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

४१. निविदेमध्ये औषध फवारणी टेम्पोंची संख्या अंदाजित दिलेली असून त्यापेक्षा जास्त किंवा कमी टेम्पोंची मागणी करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे व तो निविदाकारांवर बंधनकारक राहील. मंजुर दर ५ वर्षासाठी असून आवश्यकता वाटल्यास निविदेचा कालावधी वाढवला जाईल.

करारनामा लिहून देणारा प्रथम पक्षिय | करारनामा लिहून देणारा व्दितीय पक्षिय

कोकीळा टुर्स अँण्ड ट्रॅव्हल्स
प्रोप्रायटर

सन २०२१/२२ / करारनामा रजिस्टर अनु. क्रं. २५४ दि. २०/१/२२ अन्वये नोंद करणेत आली.

मे. कोकिळा टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स

उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका.